राज्यात नवीन पारेषण प्रकल्प उभारणीसाठी वीजदरावर आधारित स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी निविदा प्रक्रिया समन्वयक Bid Process Co-ordinator (BPC) नियुक्त करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१८/ प्र.क्र.२१४/ऊर्जा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २ मे, २०१९

**वाचा :-** १) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र. CMD/MSETCL/CO/२०१९,दिनांक २२.०२.२०१८
२) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. संकीर्ण -२०१८/ प्र.क्र.२१४/ऊर्जा-४, दिनांक ०४.०१.२०१९
३) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र.CMD/MSETCL/STU/TBCB/१७६०,दिनांक २७.०२.२०१९
४) अधिकार प्राप्त समितीच्या दिनांक १४.०२.२०१९ व १७.०३.२०१९ रोजीच्या बैठकांचे इतिवृत्त
५) मुख्य अभियंता, राज्य पारेषण उपक्रम कार्यालयाचे दिनांक ०४.०४.२०१९ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना :-**

राज्यातील पारेषण प्रकल्प उभारणीसाठी वीज दरावर आधारित स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत शासन निर्णय,उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१४/उर्जा-४ शासन निर्णय दिनांक ०४.०१.२०१९ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.

२. सदर प्रक्रियेव्दारे पारेषण प्रकल्पांची कामे करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार खालील प्रमाणे अधिकारप्राप्त समिती (Empowered Commitee) स्थापन करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| १) प्रधान सचिव (ऊर्जा) | ..... अध्यक्ष |
| २) अप्पर मुख्य सचिव (नियोजन) यांचे प्रतिनिधी | ..... सदस्य |
| ३) प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग | ..... सदस्य |
| ४) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण कंपनी | ..... सदस्य |
| ५) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण कंपनी | ..... सदस्य |
| ६) ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ (स्वतंत्र) | ..... सदस्य |
| ७) आर्थिक क्षेत्रातील तज्ज्ञ ( स्वतंत्र) | ..... सदस्य |
| ८) मुख्य अभियंता (राज्य पारेषण उपक्रम) | .......समन्वय/सदस्य सचिव |

उपरोक्त समितीच्या बैठका दिनांक १४.०२.२०१९ व दिनांक ०७.०३.२०१९ रोजी संपन्न झाल्या होत्या. या बैठकांमध्ये समितीने निर्देश दिल्याप्रमाणे वीज दरावर आधारित स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया अंतर्गत राज्यात नविन पारेषण प्रकल्प उभारणीसाठी निविदा प्रक्रिया समन्वयकची Bid Process Co-ordinator (BPC) नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :-

अधिकार प्राप्त समितीच्या बैठका दिनांक १४.०२.२०१९ व दिनांक ०७.०३.२०१९ रोजी संपन्न झाल्या होत्या. या बैठकीमध्ये मुख्य अभियंता, राज्य पारेषण उपक्रम (समन्वयक सदस्य) यांच्याकडून वीज दरावर आधारित स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया अंतर्गत काही पारेषण प्रकल्पांची उभारणी करण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्यास अधिकार प्राप्त समितीने(Empowered Committee ) मान्यता दिलेली आहे. सदर प्रकल्पांसाठी अधिकार प्राप्त समितीने प्रस्तावित केल्यानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीला निविदा प्रक्रिया समन्वयक Bid Process Co-ordinator (BPC) म्हणून मान्यता देण्यात येत आहे. सदर पारेषण प्रकल्पांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पारेषण प्रकल्पाचे नाव | निविदा प्रक्रिया समन्वयक |
|---|---|---|
| १ | ४०० के.व्ही. विक्रोळी उपकेंद्र | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या. |
| २ | ७६५ /४०० के.व्ही. शिक्रापुर-लोणीकंद व्दिदल पारेषण वाहिनी | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या. |
| ३ | २२० के.व्ही. तळेगाव (पॉवर ग्रीड ) - खेड सिटी व्दिदल पारेषण वाहिनी | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या. |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०२१४५९५०७७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Digitally signed by Uddhav Dattatraya Walunj
Date: 2019.05.02 15:08:09 +05'30'

**( उ. द. वाळुंज )**
**शासनाचे सह सचिव**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०००३५

२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

४) अप्पर मुख्य सचिव. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

५) प्रधान सचिव,वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई

६) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या, प्रकाशगंगा, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

७) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

८) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

९) मुख्य अभियंता, राज्य पारेषण उपक्रम, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या, प्रकाशगंगा, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

१०) निवड नस्ती (ऊर्जा-४).